इलेक्टॉनिक्स व संगणकशास्त्र विभागामार्फत दोनदिवसीय कार्यशाळा पार पडली

सातारा : रयत शिक्षण संस्थेच्या यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयुट ऑफ सायन्स (स्वायत्त), सातारा येथे इलेक्टॉनिक्स व संगणकशास्त्र विभागामार्फत दोनदिवसीय कार्यशाळा “Global Business Foundation Skill” या विषयावर कॉलेज मध्ये संपन्न झाली. कार्यशाळेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना रोजच्या पायाभूत कौशल्याच्या आधारे प्रशिक्षित करून त्यांनी रोजगार मिळवण्यासाठी आणि उदयोग करण्यासाठी तयार व्हावे.

“Global Business Foundation Skill” या दोनदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी डायरेक्टर, आर. आय. आर. डी., सातारा येथील डॉ. उत्तमराव मुळीक आणि संचालीका, k2p Solution, सातारा येथील मा. प्राची मोरे या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिले. यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयुट ऑफ सायन्स, सातारा चे प्राचार्य डॉ. के. जी. कानडे व इलेक्टॉनिक्स व संगणकशास्त्र विभागाचे विभागप्रमुख मा. प्रा. जे. ए. वाघ यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

प्रमुख पाहुणे डॉ. उत्तमराव मुळीक यांनी विद्यार्थ्यांना संशोधनावरती मार्गदर्शन केले. यानंतर आयोजित केलेल्या कार्यशाळेत मा. प्राची मोरे यांनी Industry awareness आणि Business Communication Skill या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच प्रा. सी. आर. शिंदे आणि प्रा. एम. डी. साळुंखे यांनी “PC & Data Skills” यामध्ये औदयोगिक क्षेत्रात उतरू पाहणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना इंटरनेट नेटवर्कींग आणि मायक्रोसॉफ्ट ऑफीस या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. एस. आर. निकम यांनी “Customer Management” या विषयातून ग्राहकांसोबतचे व्यवहार ज्ञान सांगितले. डॉ. जी. व्ही. जाधव यांनी विद्यार्थ्यांना “Personality Development” या विषयावर मार्गदर्शन केले.

कार्यशाळेमध्ये सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयुट ऑफ सायन्स, सातारा चे प्राचार्य डॉ. के. जी. कानडे यांनी अध्यक्षीय भाषणात मार्गदर्शन केले. या दोन दिवसीय कार्यशाळेमध्ये ७०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या पार पडलेल्या कार्यशाळेच्या समारोपासाठी दहिवडी कॉलेज, दहिवडी चे प्राचार्य मा. डॉ. बी. टी. जाधव प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते. तसेच यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयुट ऑफ सायन्स, सातारा चे उपप्राचार्य डॉ. एच. व्ही. देशमुख, प्लेसमेंट सेल चे विभागप्रमुख डॉ. जे. आर. जाधव तसेच इलेक्टॉनिक्स व संगणकशास्त्र विभागाचे विभागप्रमुख मा. प्रा. जे. ए. वाघ उपस्थित होते. मान्यवरांनी नवीन टेक्नॉलॉजी मध्ये होणारी प्रगती, आधुनिक काळानुसार होणारे बदल व विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरसंबधी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेचे सुत्रसंचालन प्रा. गौरी शेंडगे आणि प्रा. के. व्ही. जाधव यांनी केले. दोन दिवसीय कार्यशाळेचे संगणकशास्त्र विभागातील प्रा. सी. आर. शिंदे यानी आभार मानले.

-----------------------------------------------------------

जा.नं.      /२०१७-१८

प्रति,
मा.संपादक
दैनिक पुण्य नगरी
सातारा.

महोदय,
आमच्या महाविद्यालयाची बातमी दैनिकात प्रसिध्द करणे विषयी विनंती आहे.
कळावे,

आपला विश्वासू,

प्राचार्य,
यशवंतराव चव्हाण इन्स्टि. ऑफ सायन्स,
सातारा